**एस.सी. सी. क्रं. १२७६/२०२२**
**सा.क्र. ०३ नि.क्र. २०**
**सरकार वि. दत्तु मोकासे**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३**
**साक्षीदाराचे नाव- कदीर फकीरा पटेल**
**वय. ५४ वर्ष, सध्या नेमणुक पिशोर पोलिस स्टेशन**

**सरतपास शपथेवर सरकारी पक्षातर्फे श्री. पी.आर.कुर्लेकर वकील .**

**१.** मी सध्या पिशोर येथे कार्यरत आहे. दिनांक ०९.११.२०२२ रोजी मी पिशोर पोलिस ठाणे येथे कार्यरत होतो. गु. र. क्र. ३९५/२०२२ कलम ३७९ भारतीय दंड विधान १८६० अंतर्गत दोन आरोपी नामे विशाल राजु चव्हाण व दुसरा दत्तु तुकाराम मोकासे यांना रात्री २१.०० वाजता अटक करण्यात आली होती. त्यांना दिनांक १०.११.२०२२ रोजी कन्नड न्यायालयात रिमांड मध्ये हजर करण्यात आले त्यामध्ये आरोपींना एक दिवसाची कस्टडी देण्यात आलेली होती.

**२.** आम्ही आरोपींना घेउन पोलिस ठाण्यात गेलो होतो. पोलिस ठाण्यातुन आम्ही आरोपींना सरकारी दवाखाना ग्रामीण रुग्णालय पिशोर येथे वैद्यकिय तपासणी करण्यासाठी घेउन गेलो होतो. तेथे डॉ. कोकणे हजर होते. वैद्यकिय तपासणी करण्याकरीता आरोपी दत्तु मोकासे यांना मोकळे करण्यात आले होते व तेव्हा आरोपींनी त्या गोष्टीचा फायदा घेतला व तो पाठीमागच्या दरवाज्यातुन पळुन गेला. त्यावेळी माझ्या सोबत पोहेका ८०८/सोनवणे, पोहेका/५५७ चेळेकर व पोका/१६५९ सपकाळ होते. माझे तिघेही सहकाही आरोपीच्या मागे पळाले. अंधार असल्यामुळे आरोपी झाडाझुडपातुन पळुन गेला व आम्हाला सापडला नाही.

**३.** मी ईतर आरोपींना तपासण्यासाठी घेउन जाऊन लॉकअप मध्ये बंद केले व आमचे एपीआय शिंदे मॅडम यांना माहीती दिली. वरीष्टांच्या आदेशान्वये आरोपींना पकडण्यासाठी पोलिस रवाना झाले होते. मी पोलिस ठाण्यात जाउन आरोपी विरुध्द फिर्यादी दाखल केली. आता मला निशाणी २१ वरील फिर्याद दाखविण्यात आली ती तीच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. आरोपीची गैरहजेरी **निशाणी १९** वर माफ करण्यात आली.

<u>सरतपास पुर्ण.</u>

<u>उलटतपास आरोपी तर्फे विधीज्ञ श्री.डी. एफ. म्हस्के वकील यांच्याद्वारे</u>

४. मी आरोपींनी पिशोर पोलिस ठाण्यामधुन संध्याकाळी १८.३० वाजता घेउन सरकारी दवाखान्यात गेलो. पिशोर ग्रामीण रुग्णालय पिशोर पोलिस ठाण्याच्या समोरच आहे व दोनशे ते अडीचशे फुटावर आहे. सरकारी दवाखान्याचे मालमत्ता तपशील मला सांगता येणार नाही. घटनास्थळाच्या दक्षिणेला दवाखान्याचे गेट आहे. उत्तरेला पाठीमागचे दार असुन त्या दाराने आरोपी पळाला होता. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाबाबत मला माहीती नाही. ओपीडी पश्चिम बाजुस आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ चुकीचे दर्शविण्यात आलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वरिष्टांना आरोपीच्या संदर्भात माहीती व ईतर कोणतेही दस्तऐवज दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, तुम्ही घटनेची वेळ चुकीची सांगीतलेली आहे.

५. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीवर गुन्हा दाखल होता या संदर्भात मी चौकशी केली नाही. साक्षीदार स्वतःहुन सागतो की, आरोपीवर दोषारोप पत्र दाखल आहे त्याच्याकडुन मुददेमाल जप्त करण्यात आला.

६. घटना घडल्यानंतर त्याच दिवशी पहाटे दिनांक ११.११.२०२२ रोजी सकाळी ०१.०० काही मिनीटांनी देण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही वरिष्टांना दाखविण्यासाठी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by VIJAYA NARAYANRAO KATKAR
Date: 2024.12.06 10:58:45 +0530

**(काटकर विजया एन.एस.)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.३), कन्नड.**

**दिनांक– ०५.१२.२०२४**